## नि.दि.मु.क्र. ३९/२०१३ मधील नि. ४२ वरील आदेश

०१. प्रतिवादी क्र. ३ व ४ यांच्याविरुध्द विनाकैफियत व विना प्रतिदावा कैफियत आदेश पारीत झालेला आहे. तो आदेश रद्द करुन मिळण्यासाठी सदरचा अर्ज आहे. त्यांचे असे कथन आहे की सदर दाव्याकामी आवश्यक कागदपत्रे सापडून न आल्यामुळे व प्रतिवादी क्र. ४ हिला हृदयविकाराचा सौम्य झटका असल्यामुळे तिच्यावर वैद्यकीय उपचार चालू असल्याने ते वकिलांशी संपर्क साधून दाव्याच्या कामी कैफियत व प्रतिदाव्यावर म्हणणे देण्याकरीता आवश्यक माहिती व कागदपत्र देवू शकले नाहीत. त्यामुळे विनाकैफियत व विना प्रतिदावा कैफियत आदेश पारीत झालेला आहे. सबब न्यायाच्या हेतूने सदरचा आदेश रद्द करुन प्रतिवादींना कैफियत दाखल करुन घेण्यास परवानगी मिळावी.

०२. सदरच्या अर्जाला प्रतिवादी क्र. २ यांनी हरकत घेण्यात आलेली आहे. त्यांचे असे कथन आहे की प्रतिवादीने अर्जात त्यांच्याविरुध्द विनाकैफियत आदेश कोणत्या तारखेला करण्यात आला व प्रतिवादी किती दिवसांचा विलंब माफ करुन मागत आहे हे नमूद नाही. अर्जात दिलेली कारणे संयुक्तीक नाही. सबब त्यांनी अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली.

०३. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला. मान. सर्वोच्च न्यायालयाने कैफियत विलंब माफीसाठी <u>*राणी कुसुम वि. कांचन देवी २००५ एआयआर सर्वोच्च न्यायालय पृष्ठ क्र. ३३०४*</u> या न्यायनिर्णयामध्ये दिलेली मार्गदर्शक तत्वे विचारात घेता व नैसर्गिक न्यायाच्या दृष्टीकोनातून देखील एखाद्या पक्षकाराला त्याची बाजू मांडण्यासाठी पुरेशी संधी देणे गरजेचे आहे. तसेच दिवाणी प्रक्रिया संहिता १९०८ चे आदेश ८ नियम १ मधील तरतूदी या मागदर्शक स्वरुपाच्या आहेत. अन्यथा त्यांच्यावर अन्याय केल्यासारखे होईल. तशी संधी दिल्यास प्रतिवादी क्र. २ यांचे देखील काही नुकसान होणार नाही. उलट त्यामुळे दोन्ही पक्षकारांमधील वाद एकाच प्रकरणात निकाली होण्यासाठी मदत होईल व त्यामुळे त्यांच्यात अनावश्यक इतर प्रकरणे होणार नाहीत. प्रतिवादी क्र. ३ व ४ यांची कैफियत व प्रतिदाव्यावर कैफियत दाखल करुन घेणे न्यायाच्या दृष्टीकोनातून व दावा गुणदोषावर

चालविण्यासाठी आवश्यक आहे. सबब प्रतिवादी क्र. ३ व ४ यांनी एकत्रीतरित्या रक्कम रु. २००/— खर्च प्रतिवादी क्र. २ यांना देण्याच्या अटीवर अर्ज मंजूर करण्यात येतो.

सही/—

(एस.एच.पन्हाळे)

दि. ११/०१/२०१७ दिवाणी न्यायाधीश क.स्तर मालवण